INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 13 | ISSUE - 3 | APRIL - 2023

# "जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, चव्हाणवाडी ता.तुळजापूर जि.उस्मानाबाद येथील इयत्ता ५ वी च्या विद्यार्थ्यांना मराठी विषयाच्या शुध्दलेखन या घटकात येणाऱ्या अडचणींचा शोध व उपाय."

सुखदेव विष्णू भालेकर
एम.ए. (इंग्रजी, इतिहास, शिक्षणशास्त्र), डी.एड्., बी.एड्., डी.एस.एम.
सहशिक्षक, जि.प.प्रा.शा. चव्हाणवाडी ता. तुळजापूर जि. उस्मानाबाद.

## प्रस्तावना :-




भारतीय राज्यघटनेतील '२१-अ' कलमानुसार ६ ते १४ वयोगटातील सर्व मुला-मुलींना सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण देणे अनिवार्य आहे. हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी केंद्र व राज्यसरकार विविध प्रयत्न करत आहेत.

प्राथमिक स्तरावर इयत्ता १ ली ते ५ वी इयत्तेपर्यात मुलांनी भाषा विषयातील विविध क्षमता आत्मसात करणे आवश्यक आहे. त्यापैकी श्रवण, वाचन, भाषण व लेखन या मराठी भाषेतील मूलभूत क्षमता आहेत. मुलांना मातृभाषेवर प्रभुत्व मिळवता यावे, यासाठी या चार क्षमतांचे दृढीकरण प्राथमिक स्तरावर करणे अपेक्षित आहे.

## संशोधनाची गरज :-

भाषा अध्ययनाच्या नैसर्गिक प्रक्रियेनुसार लेखन कौशल्य आत्मसात करणे हा शेवटचा टप्पा आहे.

असे असले तरी श्रवण, भाषण, वाचन या कौशल्यांच्या सोबतच लेखन कौशल्य विद्यार्थ्यांमध्ये विकसित करणे गरजेचे आहे. लेखन कौशल्य हे आत्मसात करणे थोडे अवघड आहे. सर्व विद्यार्थ्यांची आकलन क्षमता देखील सारखी नसते. त्यामुळे इयत्त ५ वी च्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या लेखनात चूका झालेल्या आढळून येतात. या चूका शोधून त्यांच्यावर उपाय योजना करण्यासाठी हे संशोधन करणे अत्यंत महत्त्वाचे ठरते.

## संशोधनाचे महत्त्व :-

प्राथमिक शालेय स्तरावर विद्यार्थ्यांना शुध्दलेखन करता येणे महत्त्वाचे आहे. कारण लहान वयात लेखनाच्या योग्य सवयी मुलांना लावल्या, तर विद्यार्थी लेखन कौशल्यावर सहज प्रभुत्व प्राप्त करु शकतील.

परंतु मातृभाषा असूनही दीर्घोत्तरी प्रश्नांच्या उत्तर लेखनात तसेच निबंधलेखनातील विद्यार्थी मागे पडतात याबाबत विद्यार्थ्यांच्या लेखनाच्या समस्यांचा शोध घेऊन त्यावर उपाय योजना करणे महत्वाचे ठरते.

प्रचलित परीक्षापध्दतीमध्ये लेखन कौशल्याद्वारेच जास्तीत जास्त मूल्यमापन केले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शुध्दलेखनात होणाऱ्या चुकांवर संशोधन करणे महत्वाचे ठरते.

## समस्या विधान :-

"जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, चव्हाणवाडी ता.तुळजापूर जि.उस्मानाबाद येथील इयत्ता ६ वी च्या विद्यार्थ्यांना मराठी विषयातील शुध्दलेखन या घटकात येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे व उपाय सुचविणे."

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

१. इयत्ता ५ वी च्या विद्यार्थ्यांना मराठी विषयातील शुध्दलेखन यात येणाऱ्या अडचणींचा शोध पुर्वचाचणीद्वारे घेणे.
२. शुध्दलेखन यात येणाऱ्या अडचणींचा शोध पुर्वचाचणीद्वारे घेणे.
३. शुध्दलेखनात अचूकता येण्यासाठी सराव करुन घेणे.
४. शुध्दलेखन संपादनाची परिणामकारकता अंतिम चाचणीद्वारे पडताळून पाहणे.

**गृहीतके :-**

१. शिक्षकांनी फलक लेखन करताना अचूकरित्या केले तर विद्यार्थ्यांचे शुध्दलेखन सुधारले.
२. विद्यार्थ्यांनी दररोज एक पान कोणत्याही पुस्तकातील जसेच्या तसे लिहले तर विद्यार्थी शुध्दलेखन हे कौशल्य संपादन करु शकतील.

**परिकल्पना :-**

१. उपक्रमाद्वारे शुध्दलेखनाच्या कृतिकार्यक्रमाचा विद्यार्थ्यांच्या संपादनावर धन परिणाम झालेला दिसून येईल.
२. सरावाद्वारे विद्यार्थ्यांच्या शुध्दलेखन कौशल्याच्या संपादनावर लक्षणीय धन परिणाम दिसेल.

**व्याप्ती व मर्यादा :-**

संशोधन समस्येचा तांत्रिक पातळीवर विचार करताना तो समग्र आणि व्यापक असतो. संशोधनासाठी सर्व बाबींचा विचार करता येणे शक्य नसते. म्हणून संशोधनाची व्याप्ती व मर्यादा ठरवावी लागते.

१. सदरील संशोधन हे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, चव्हाणवाडी पुरतेच मर्यादि आहे.
२. सदरील संशोधन हे इयत्ता ५ वी च्या विद्यार्थ्यांपुरतेच मर्यादि आहे.
३. संशोधन हे मराठी विषयापुरतेच मर्यादित आहे.
४. सदरील संशोधन हे २०२० ते २०२१ सालासाठी मर्यादित आहे.
५. सदर संशोधन हे मराठीतील शुध्दलेखन या कौशल्यापुरतेच मर्यादित आहे.

**संशोधनाची प्रत्यक्ष कार्यवाही :-**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, चव्हाणवाडी ता.तुळजापूर जि.उस्मानाबाद मधील इयत्ता ५ वी च्या विद्यार्थ्यांची पूर्वज्ञानावर आधारित पूर्वचाचणी घेतली ही चाचणी २० गुणांची होती. यामध्ये मुलांची प्रगती समाधानकारक नव्हती. या चाचणीच्या निकालावरुन आणि उत्तरपत्रिकावरुन मुलांच्या समस्या लक्षात आल्या व त्यांची नोंद केली.

**अभ्यासकास जाणवलेल्या समस्या :-**

१. विद्यार्थ्यांना मराठी वर्णाक्षरे व्यवस्थित लिहता येत नाहीत.
२. विद्यार्थ्यांना जोडाक्षरे लिहता येत नव्हती.
३. विद्यार्थ्यांना श्र, त्र, क्ष ही वर्णाक्षरे नीट लिहता येत नव्हती.
४. विद्यार्थी सरळ ओळीत लेखन करीत नाहीत.
५. विद्यार्थी विरामचिन्हांचा वापर करत नाही.
६. विद्यार्थी दोन शब्दांमध्ये योग्य अंतर सोडत नाहीत.

**विद्यार्थ्यांना आलेल्या समस्या :-**

१. विद्यार्थ्यांना शुध्द लेखनाचे नियम माहिती नाहीत.
२. विद्यार्थ्यांना नियम माहिती नसल्यामुळे बरेच उत्तरे चुकीची लिहली.
३. विरामचिन्हांचा वापर योग्य ठिकाणी करता येत नव्हता.
४. विद्यार्थ्यांना मराठी वर्णाक्षरे लिहता येत नव्हती.

**समारोप :-**

संशोधनाची गरज काय आहे, महत्त्व काय आहे. समस्या विधान तसेच कार्यात्मक व्याख्या, संशोधनाची उद्दिष्टे, गृहितके, परिकल्पना तसेच त्याची व्याप्ती व मर्यादा यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

## संदर्भसूची


१. प्रा.सौ. स्वाती गाडगीळ - कृतिसंशोधन व नवोपक्रम (२००७) सुविचार प्रकाशन, पुणे.
२. डॉ.व.झा.साळी, डॉ.सुरेश करंदीकर, डॉ.बी.जी.अहिरे-कृतिसंशोधन व नवोपक्रम (ऑक्टोबर २०१०) फडके प्रकाशन, कोल्हापूर.
३. डॉ.रोहिणी तुकदेव, डॉ.नागनाथ कोत्तापल्ले मराठी भाषेचा आधिष्ठान अभ्यासक्रम (एप्रिल २००८) य.च.म.मुक्त विद्यापीठ प्रकाशन, नाशिक.
४. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पूणे पाठ्यपुस्तक इयत्ता ५ वी फेब्रुवारी २००६





**सुखदेव विष्णू भालेकर**
**एम.ए. (इंग्रजी, इतिहास, शिक्षणशास्त्र), डी.एड्., बी.एड्., डी.एस.एम.**
**सहशिक्षक, जि.प.प्रा.शा. चव्हाणवाडी ता. तुळजापूर जि. उस्मानाबाद.**